01 JAN 2026
पुण्यनगरी

# जागतिक दर्जाचे स्वयंअध्ययन साहित्य काळाची गरज

## – डॉ. मधुकर वावरे



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भविष्यात शैक्षणिक क्षेत्रात केवळ ऑनलाईन शिक्षण नव्हे, तर ओपन अँड डिस्टन्स मोड व ऑनलाईन मोड या दोन्ही पद्धतींसाठी दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती करणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्रालयांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरशिक्षण विभागाचे सहसचिव डॉ. मधुकर वावरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात पीएम-उषा योजनेंतर्गत विविध अभ्यासक्रमांचे अभ्यास मंडळ अध्यक्ष व घटक लेखक असणाऱ्या प्राध्यापकांसाठी आयोजित 'स्वयंअध्ययन साहित्य विकास व संपादन' या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

डॉ. वावरे म्हणाले, स्वयंअध्ययन साहित्यात आशय, सुस्पष्टता व दर्जा अत्यंत महत्त्वाचा असतो. कोविड काळात ऑनलाईन शिक्षणाची गरज प्रकर्षाने जाणवली असून, आज भारतात दरवर्षी सुमारे २० लाख विद्यार्थी ऑनलाईन, तसेच ओपन अँड डिस्टन्स मोडमधून शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या दोन्ही पद्धतींसाठी उच्च दर्जाचे, संवादात्मक आणि शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे.

हे स्वयंअध्ययन साहित्य केवळ आपल्या विद्यापीठापुरते किंवा भारतापुरते मर्यादित न राहता, जागतिक पातळीवर शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी संदर्भग्रंथासारखे उपयुक्त ठरले पाहिजे. असे साहित्य शिक्षण क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरावे, तसेच विद्यार्थी, शिक्षक, राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठीही साहाय्यभूत ठरावे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणाला उज्ज्वल भवितव्य आहे. त्यामुळे स्वयंअध्ययन साहित्याची गुणवत्ता वाढवणे आवश्यक असून, त्यातून राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाची ओळख निर्माण झाली पाहिजे. प्रमुख पाहुणे म्हणून माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव विनय शिंदे व लेखक उपस्थित होते. प्रास्ताविक संचालक डॉ. कृष्णा पाटील, तर सूत्रसंचालन सुमन लोहार व प्रियांका सुर्वे यांनी केले. आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

01 JAN 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनासह प्रशासनातही विद्यापीठाची घोडदौड कायम

## २० संशोधकांचा टॉप टू मध्ये समावेश : प्रशासनाच्या सर्वेक्षणात राज्यात व्दितीय

**जनप्रवास : अहिल्या परकाळे**

शिवाजी विद्यापीठ २०२४-२०२५ या वर्षात दर्जेदार शिक्षण, संशोधनासह प्रशासकीय कामातही अव्वल ठरले आहे. तब्बल २० संशोधक टॉप टू मध्ये आले आहेत. जवळपास १० विद्यार्थ्यांनी स्टार्टअप सुरू केली आहेत. तसेच बऱ्याच वर्षापासून प्रलंबित असलेला भुयारी मार्ग सुरू झाला आहे. अनेक इमारतींचे जाळे उभारले असून विद्यार्थ्यांना प्राथमिक सोयीसुविधा दिल्या आहेत. ऑनस्क्रीन पेपर तपासणीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाची संशोधनासह प्रशासनात घोडदौड कायम आहे.

संशोधनात जागतिक पातळीवर शिवाजी विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. क्रीडा विभागाच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा, पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत अनेक सुवर्णपदके पटकावली आहेत. एवढेच नाही तर कमवा व शिका योजना, विद्यार्थिनी, क्रीडा व विद्यार्थी विकास केंद्राच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह बांधले आहे. ४५३ सत्र परीक्षांच्या पेपरची ऑनस्क्रीन पेपर तपासणी केली जाते. तसेच परीक्षा प्रमाद समितीचे संपूर्ण काम ऑनलाईन सुरू आहे. परीक्षेचा अर्ज भरण्यापासून निकालापर्यंत सर्व कामकाज ऑनलाईन होते. त्यामुळे यंदा परीक्षा विभाग १०० टक्के ऑनलाईन होण्याच्या मार्गावर आहे. विज्ञान विभागातील सर्वच विभागांनी संशोधनावर भर दिला आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षकांच्या संशोधनाला पेटंटही प्राप्त झाले असल्याने दर्जेदार संशोधनाचा टक्का वाढत आहे. तसेच दूरशिक्षण विभाग संपूर्णपणे ऑनलाईन झाला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या सर्व सुविधा मिळत आहेत. नुकत्याच झालेल्या अधिसभेत ३३ ठराव मंजूर करून विक्रमच केला आहे. सरत्या वर्षात अनेक अध्यासनही सुरू केली आहेत. विद्यापीठाच्या प्रगतीचे संपूर्ण श्रेय माजी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह संपूर्ण प्रशासकीय कर्मचाऱ्यांना जाते. डॉ. शिर्के यांनी शिक्षण, संशोधन, कला, क्रीडा, सर्वच क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच पाहिजे तिथे मदतही केली, त्यामुळेच शिवाजी विद्यापीठाच्या यशाचा झेंडा जगभर फडकवला जात आहे.




### कुलगुरू निवडीकडे सर्वांचे लक्ष

ऑक्टोबरमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची मुदत संपली आहे. सध्या प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाचा पदभार आहे. त्यामुळे कायमस्वरूपी कुलगुरूंची निवड करा, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली होती. त्याप्रमाणे कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू झाली असून, कुलगुरू निवड प्रक्रिया कधी पूर्ण होणार याकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### संशोधन

- सास्कॅन फोर्ड विद्यापीठाच्या सर्वेक्षणातील संशोधकांच्या टॉप टूच्या यादीत २० संशोधकांचा समावेश
- एनआयआरएफ राज्य विद्यापीठात देशात : ४५ वा रँक बँड
- स्टार्टअपसाठी : १० संशोधकांना निधी
- विद्यापीठाला मिळालेली पेटंट : १५०
- स्टार्टअप : ११०
- देशविदेशातील सामंजस्य करार : १५०

### प्रशासनात प्रगती

- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सर्वेक्षणात द्वितीय, १०० पैकी ६६ गुण प्राप्त
- ६० कोटीतून अनेक इमारतीचे बांधकाम
- अंतर्गत रस्ते दुरुस्ती लाखो रुपये
- स्वतःचे सॉफ्टवेअर तयार केले
- एमकॉम व एमएस्सी मॅथेमॅटिक ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करणारे पहिले अकृषी विद्यापीठ
- भुयारी मार्ग ८.५० कोटी
- मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका

जनसंपर्क कक्ष
01 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजकार्य, तंत्रज्ञानाची सांगड कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : डिजिटल माध्यमांचा प्रभाव समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असताना समाजकार्य अधिक परिणामकारक करण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य, नैतिक आणि जबाबदार वापर अत्यावश्यक आहे. या उद्देशाने यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेच्या एमएसडब्ल्यू (समाजकार्य) अभ्यासक्रमातर्फे 'सोशल मीडिया आणि समाजकार्य' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यशाळेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रशालेचे संचालक डॉ. नितीन माळी यांनी उपस्थितांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. उमेश गडेकर यांनी केले. यावेळी डॉ. अमोल मिणचेकर उपस्थित होते. आभार डॉ. उर्मिला दशवंत यांनी मानले.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी पहिल्या सत्रात पल्लवी देसाई यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डॉ. सुमेधा साळुंखे यांनी 'समाजकार्यात सोशल मीडियाची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी विशाल नार्वेकर यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि समाजकार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर बँकॉक येथे कार्यरत असलेले डॉ. महेश चौगुले यांनी 'सोशल मीडिया आणि धोरण बदल' या विषयावर आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचा समारोप डॉ. उमेश गडेकर आणि डॉ. अमोल मिणचेकर यांच्या उपस्थितीत झाला. सूत्रसंचालन प्रतिमा पाटील व अर्पिता सावंत यांनी केले.

01 JAN 2026
पुढारी

# विद्यापीठात उद्या 'नवीन कामगार संहिता' विषयावर व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, अर्थशास्त्र विभाग तसेच कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा सॉफ्ट कॉम्पोनंट उपक्रमांतर्गत 'नवीन कामगार संहिता व त्यांचे व्यवस्थापनावरील परिणाम' या विषयावर शनिवार (दि. ३) रोजी दुपारी ३ वाजता मानवविद्या सभागृह व्यवस्थापन विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. कार्यक्रमासाठी भारत फोर्ज लिमिटेड माजी संचालक डॉ. संतोष भावे, अ‍ॅड. वरुण जोशी, अ‍ॅड. दीपक जोशी, अ‍ॅड. राजेंद्र चव्हाण प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

0 1 JAN 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आज 'प्रबोधन चळवळ' कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३१ : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागातर्फे 'प्रबोधन चळवळ आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर उद्या(गुरुवारी) मानव्यशास्त्र सभागृहात कार्यशाळा होणार आहे. पहिल्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत.

दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. भारत पाटणकर (विषय-सत्यशोधक चळवळ आणि आजचा महाराष्ट्र), सत्राचे अध्यक्ष डॉ. भारती पाटील (प्रबोधन चळवळ आणि स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न) मार्गदर्शन करतील. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. अ[illegible] शिंदे (सत्यशोधक पत्रकारिता [illegible] समकालीन महाराष्ट्र), सत्राचे अध्यक्ष डॉ. सुनीलकुमार लवटे (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व प्रबोधन चळवळीचा इतिहास) आणि चौथ्या सत्रात डॉ. विलास पोवार (प्रबोधन चळवळीचे तत्त्वज्ञान आणि महाराष्ट्राचा विकास), सत्राचे अध्यक्ष डॉ. रवींद्र भणगे (प्रबोधन चळवळीची वाटचाल) विचार मांडणार आहेत.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 JAN 2026

पुण्यनगरी

# परीक्षेविषयी असणारी भीती दूर करा : डॉ. कृष्णा पाटील

**नणुंद्रे : प्रतिनिधी**

एम.ए., एम.एस्सी. करत असताना विद्यार्थ्यांनी नेट/सेटचा अभ्यास करणे गरजेचे आहे. योग्य दिशा व गती मिळवायची असेल, तर विद्यार्थ्यांनी स्वतःला प्रश्न विचारले पाहिजेत. लेखी परीक्षेचे तंत्र समजून घ्या. प्रश्न काय आहे हे अगोदर समजून घ्या, म्हणजे उत्तर लिहिण्यास कोणतीही अडचण येणार नाही. परीक्षेविषयी आपल्या मनात असणारी भीती दूर करा. प्रश्नांशी मैत्री करा म्हणजे यश निश्चित मिळेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील सायन्स विभागामार्फत आयोजित केलेल्या एकदिवसीय नेट/सेट मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. कृष्णा पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले, या भागातील विद्यार्थी शिकला पाहिजे आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये गेला पाहिजे, यासाठी या महाविद्यालयाची स्थापना डॉ. के.एस.चौगुले यांनी केली आहे. विद्यार्थ्यांनी योग्य पद्धतीने अभ्यास केला, तर कोणत्याही परीक्षेमध्ये यश निश्चित मिळते. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना महावीर कॉलेज, कोल्हापूर येथील बी.ए.बी.एड. विभागातील डॉ. शशिकांत अन्नदाते म्हणाले, आपली शिक्षण पद्धती विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य, चांगल्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत. स्वःतावर विश्वास ठेवा. सातत्यपूर्ण सराव करा, म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल.

कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील, ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, हिंदी विभागप्रमुख डॉ. वंदना पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सहसमन्वयक डॉ. एस. एस. कुरलीकर, कार्यशाळा समितीप्रमुख डॉ. यू. एन. लाड होते. प्रास्ताविक व स्वागत प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण यांनी केले. आभार प्रा. ट्विंकल सावंत यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. तब्बू कवठेकर यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

01 JAN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडे राज्याच्या क्रीडा धोरणाची जबाबदारी

## डॉ. शरद बनसोडे नोडल अधिकारी; कोल्हापूरच्या क्रीडाविश्वासाठी अभिमानाची बाब

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठाकडे राज्याचे विद्यापीठ क्रीडा धोरण तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. डॉ. शरद बनसोडे यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही कोल्हापूरच्या क्रीडा विश्वासाठी अभिमानास्पद बाब आहे.

गुड न्यूज

कोल्हापूर क्रीडा पंढरी म्हणून ओळखली जाते. खाशाबा जाधव यांच्यापासून वीरधवल खाडे तेजस्विनी सावंत, राही सरनोबत, स्वप्निल कुसाळेपर्यंतच्या या भूमीने ऑलिम्पिक वीर देशाला दिले आहेत. त्याचबरोबर अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत आहेत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी दिलेला क्रीडा परंपरेचा वारसा आजही कोल्हापूरचे खेळाडू व प्रशिक्षक जपत आहेत.



क्रीडा धोरण तयार करण्यासाठी सात सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. त्यांच्या बैठका सध्या सुरू आहेत. या धोरणाचा मसुदा तयार करण्याचे काम सुरू आहे. यात प्रमुख कुस्ती, कबड्डी, जलतरण, धनुर्विद्या, ॲथलेटिक्स, नेमबाजी, बॅडमिंटन, टेबल टेनिस यासह हॉकी, हँडबॉल खेळांचा समावेश आहे. क्रीडा धोरणामध्ये महाविद्यालयीन, विद्यापीठ खेळाडूंना त्याचबरोबर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण व उच्च दर्जाच्या स्पर्धांमध्ये सहभाग करण्याची संधी मिळणार आहे.



त्याचबरोबर खेळाडूंची कामगिरी वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ पुरस्कार विजेते, स्पोर्ट्स् मानसोपचार तज्ज्ञ, आहार तज्ज्ञ, अशा अनुभवींच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त खेळाडू क्रीडा क्षेत्राकडे वळतील आणि महाराष्ट्र सोडून इतर राज्यांमध्ये सरावासाठी जाणारे खेळाडू हे महाराष्ट्रामध्येच सरावासाठी राहतील ऑलिम्पिक, कॉमनवेल्थ गेम्स, एशियन गेम्स आणि जागतिक स्पर्धेसाठी खेळाडू तयार होतील यासाठीच्या आवश्यक बाबींचा धोरणात समावेश असणार आहे.

> महाराष्ट्र राज्य विद्यापीठ क्रीडा धोरण तयार करण्याची जबाबदारी शिवाजी विद्यापीठाला मिळाल्याबद्दल खूप आनंद होत आहे. शहर व ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंना अद्ययावत प्रशिक्षण विविध केंद्रांमार्फत उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यांचे भविष्य क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल होण्यास यामुळे मदत मिळेल. सर्व सुविधायुक्त प्रशिक्षण केंद्रे महाविद्यालय आणि विद्यापीठांमध्ये येणाऱ्या काळात होणार आहेत.
>
> **- डॉ. शरद बनसोडे**, संचालक, क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ